**पालक प्रगल्भ होत आहेत.........**

10 ते 15 पंधरा वर्षा पूर्वीची गोष्ट आहे. माझ्या ओळखीतली एक मुलगी - मधुरा अमेरिकेला निघाली होती msकरायला . तिचे लग्नही ठरले होते. तिचा होणारा नवरा सागर अमेरिकेतच नोकरी करत होता. साहजिकच माझ्या मनात विचार आला की ही आता  प्रथम कुठे जाईल ? माझा मुलगा तेव्हा कॉलेज च्या शेवटच्या वर्षात शिकत होता. मी सहज त्याला विचारले की मधुरा आता पहिल्यांदाकुठे जाईल ?

तो म्हणाला ," सागरकडे "  मला एकदम धक्काच बसला.

मी म्हटलं , " अरे पण त्याचं लग्न कुठे झालंय ? त्या आधीच ती त्याच्याकडे रहायला क शी जाईल ? Risky नाही का ते ?"

तो म्हणाला, " आई, ती एक परक्या प्रदेशात जात्येय. तिथे कुणीच ओळखीचं नाही. त्यातल्या त्यात सागरच तिच्या ओळखीचा आहे.सागर कडे तिने जाणे हे safe नाही का ?"

मी म्हटलं, "  अरे हो की, हे माझ्या कसं लक्षात नाही आलं ? माझ्या डोक्यात वेगळाच मुद्दा होता. "

तो म्हणाला, "  आई,  मला कळतंय तुझ्या मनात काय आहे ते. पण its ok .  We are capable to take responsibility of ourselves." मला मनातून त्याचे कौतुकच वाटले.

आज मी जेव्हा या प्रसंगाचा विचार करते तेव्हा मला त्यात काहीच गैर वाटत नाही. सगळ्याचे सामाजिक संदर्भ दर थोड्या वर्षागणिक बदलत जात असतात. गेल्या पंधरा वीस वर्षात पालकही किती बदललेत. अगदी पंचवीस तीस वर्षापूर्वीपर्यंत एखाद्या मुलीनं/ मुलानं  केवळ love marriage ठरवलं तर केव्हढा विरोध व्हायचा. माझ्या आसपास अशी अनेक उदाहरणे होती.पण आता मात्र जवळ जवळ प्रत्येक पालक  म्हणतात की तुझं तू पाहिलंस तर फारच छान !! अगदी त्याच वेळी म्हणजे २५/३० वर्षापूर्वी कॉलेज मध्ये मुला-  मुलींचाएकत्र ग्रुप असणं हेच एक अपूर्वाई चे होते. आज अगदी सर्रास असे अनेक ग्रुप असतात. जवळ पास प्रत्येक मुलाला अनेक मैत्रिणी आणि तसेच प्रत्येक मुलीला अनेक मित्र असतात.एकमेकांच्या घरी ते सगळे येत जात असतात.आणि मुख्य म्हणजे त्यात पालकांना काही विशेष वेगळे असे वाटत नाही.

पालकांची पिढी देखील नित्य नेमाने नवीन काहीतरी शिकते आहे.झपाट्याने सगळ्या गोष्टी बदलत आहेत. अगदी पाच सहा वर्षापूर्वीची गोष्ट आहे. सुलेखा ही मंजिरीची सून – अमेरिकेतून एक महिन्यासाठी भारतात यायची होती. त्यासाठीमंजिरीने पूर्ण एक महिन्याची रजा घेतली . सुलेखा

आली तीच मुळी एअर पोर्ट वरून  थेट तिच्या आईच्या घरी गेली. दोन दिवस झाले, तीन दिवस झाले , चारही दिवस गेले. मंजिरी तिची वाट पाहत होती. कदाचित अजून jetlag गेला नसेल अशी मनाची समजूत करून घेत होती.शेवटी आठ दिवसां नंतर तिने वाट पाहून एकदा तिच्या घरी फोन ही केला. तिच्या आईने फोन उचलला. तीम्हणाली की ती तिच्या मैत्रिणीकडे गेली आहे. मंजिरी म्हणाली की मी तिची वाट पाहिली. सुलेखाची आई म्हणाली की ती घरी आली की मी तिला निरोप देते. दुसरे  दिवशी सुलेखाचा फोन आला,  ती म्हणाली , की, " माझी बरीच कामे आहेत. शिवाय मित्र आणि मैत्रिणींना पण भेटायचे आहे. मी दोन तीन दिवसांनी जेवायला येते एखाद्या दिवशी. " – मंजिरी मनातून समजून चुकली. तिने तिची रजा रद्द करून घेतली आणि ती ऑफिस ला जॉईन झाली. पण मनातून मात्र खट्टू झाली.

ही गोष्ट फार जुनी नाही. अगदी पाच सहा वर्षापूर्वीचीच.  पण आता मात्र मुलाची आई या गोष्टीला सरावली आहे. मुलगा तरी आपल्या घरी राहायला येतोय यातच ती आई सुख मानू  लागली आहे.

पालकांमधला हा बदल विलक्षण आहे. इतकंच नाही तर तरुण मुलांची भाषा देखील अनेक पालक सहजी वापरू लागले आहेत. पालक आता कॉम्पुटर ला सरावले आहेत. एक काळ असा होता की पालक साधी इ-मेल करू शकत नव्हते , पण आता मात्र अनेक पालक वेगवेगळ्या वेबसाईट पाहणे, त्या ब्राउझ करणे हे त्यांना सहजी जमते.

अगदी दोनच दिवसांपूर्वी एका मुलाचे वडील आले होते. आमचे त्यांच्या मुलाच्या लग्ना संदर्भात बोलणे चालले  होते. पटकन त्यांनी त्यांचा android फोन काढला , त्यावर  aap डाऊनलोड केलेले होते. झटकन त्यांनी वेबसाईट उघडली , आणि त्यावरची माहिती ते वाचून दाखवू लागले. पालक आता tech savvy झाले आहेत. you tube , instagram, face book , whats app या सगळ्या गोष्टी आता त्यांना नित्य सरावाच्या झाल्या आहेत. पटकन स्वतःचा DP बदलणे ह्या गोष्टी आता ते सराईत पणे करतात.

सगळ्याच संकल्पना बदलल्या आहेत.

पूर्वी सुट्टी लागली की आजोळी जाणे, नातेवाईकांकडे जाणे या गोष्टी नित्याच्या होत्याआणि एव्हढा खर्च करून जाते आहेस तर अजून चार दिवस का राहत नाहीस , अशी विचारधारा होती.पण आता नातेवाईकांकडेराहायला जाणे हे सवयीचे राहिलेले नाही.हवापालटासाठी बाहेर थंड हवेच्या ठिकाणी जाणे ही फक्त श्रीमंतांचीच असणारीमक्तेदारी  कधीच मोडीत निघाली आहे.

" गेल्याचमहिन्यात  लॉग वीक एंड आला होता,त्याला जोडून दोन दिवसाची रजा घेऊन, माझ्या दोन्ही मुली  मस्त चार- पाच दिवस सिंगापूर ला जाऊन आल्या. ----" माझी एक मैत्रीण अगदी कौतुकानं सांगत होती.

अनेक घरांमध्ये घरटी  एक तरी पाल्य परदेशात शिकायला आहे. त्यामुळे फोन , स्काईप वर बोलणे हेही अगदी नित्यसरावाचे !! आज अनेक मुले मुली

 अगदी लहान वयातच घरापासून शिक्षण किंवा नोकरी निमित्ताने घरापासून लांब जातात. स्वतःची जबाबदारी स्वतः घ्यायला शिकतात. मुलांनी घरापासून लांब जाणे हे पालकांना  आता अजिबात नवीन राहिलेले  नाही. इतकेच नाही तर एकाच शहरात नोकरीचे ठिकाण लांब असेल तर नोकरीच्या ठिकाणी स्वतंत्र जागा घेऊन मुले मुलीराहत आहेत.

सुनीताचे  नोकरीचे ठिकाण हिंजेवडीलाहोते आणि तिचे घर- म्हणजे तिच्या आई वडिलांचे घर होते पर्वतीला. तिला जायला यायला ट्राफिक मुळे दोन दोन तास लागत असत. त्यामुळे तिने हिंजेवाडीत एक छोटे घर भाड्याने घेऊन ती तिथे राहू लागली. त्यामुळे तिच्या लग्नाच्या आधीच तिने आई वडिलांचे घर सोडले आहे .

कालची चैन ही आजची गरज ठरू लागली आहे. मुलांच्या निमित्ताने का होईना पण पालकांना आता परदेशवारी घडू लागली आहे. नजरा विस्फारल्या आहेत.कक्षा रुंदावल्या आहेत.

पैसे खर्च करण्याच्या कल्पना पण बदलल्या आहेत.लाईफस्टाईल मध्ये बदल घडत आहेत.

घटस्फोट, लिव्ह इन या शब्दांनी आता पालक दचकून जात नाहीत.

एखाद्या सोसायटी मध्ये एखादे जोडपे लिव्ह इन मध्ये राहत असतील तर संस्कृती बुडाली,  इतक्या टोकाचा धक्का आता कुणाला बसत नाही. असा  विचार कुणी करत नाही.

दर दोन वर्षांनी बदलणारी लग्नेच्छू मुला- मुलींची पिढी अगदी जवळून पाहण्याचे – त्यांचे निरीक्षण करण्याची संधी माझ्या कामाच्या निमित्ताने मला मिळते आहे. पालकही अगदी दोन वर्षांनी नाही तरी दर चार पाच वर्षांनी बदलत आहेत .

कुणाला वाटेल या सगळ्या बदलांचा आणि लग्नाचा काय संबंध आहे ? पण या प्रत्येक बदलाचा आणि वैवाहिक आयुष्याचा अगदी नजीकचा संबंध आहे. या नवीन पिढीतल्या मुलाची आणि मुलीची लाईफस्टाईल जर जुळली तर त्या दोघांना एकमेकांशी जुळवून घेणे तुलनेने सोपे होऊन जाते.इतकंच नाही तर पालकांना देखील या नव्या पिढी बरोबर राहताना जमायला लागण्याचे प्रमाण तुलनेने वाढले आहे.

हासगळा  बदल निश्चितच स्वागतार्ह आहे. बदलणाऱ्या परिस्थितीबरोबर आता आपल्यालाही बदलायला हवे याचे भान असणे , हेच प्रगल्भतेचे लक्षण आहे. होय पालकही बदलत आहेत, प्रगल्भ होत आहेत.